## आदेश निशाणी क्र. २१

(दिनांक ०९ जून २०२६ रोजी पारीत)

०१. प्रतिवादीं क्र. १ व २ यांनी सदरच्या अर्जाद्वारे त्यांच्याविरुद्ध दावा विना लेखी कैफियत चालविण्याचा झालेला आदेश रद्दबातल करुन सोबत दाखल केलेली लेखी कैफियत स्वीकारण्यात यावी, अशी मागणी केलेली आहे.

०२. सदर प्रतिवादींनुसार, त्यांच्यापैकी प्रतिवादी क्र. १ हे वयोवृद्ध असून आजारग्रस्त असतात त्यामुळे ते दोघेही वकिलाशी संपर्क न करू शकल्यामुळे त्यांच्याकडे आवश्यक ती माहिती आणि कागदपत्रे दिली गेलेली नाहीत आणि त्यामुळे त्यांची लेखी कैफियत वेळेत सादर करता आली नाही. शिवाय प्रतिवादी क्र. २ हा काही काळ महत्त्वाच्या कामाकरिता बाहेरगावी गेलेला असल्याने विलंब झालेला आहे. दावा हा स्थावर मिळकतीसबंधी आणि त्यात त्यांचे हक्क गुंतलेले असल्याने त्यांना न्यायालयासमक्ष वस्तु:स्थिती आणण्यासाठी लेखी कैफियत दाखल करणे आवश्यक आहे, अन्यथा त्यांचे पैशाच्या स्वरुपात न भरुन येणारे नुकसान होईल, शिवाय झालेला विलंब हा त्यांनी जाणूनबुजून केलेला नाही किंवा त्यांचा बचाव प्रकरणाचा निर्णय गुणवत्तेवर करण्यासाठी आवश्यक आहे, तेव्हा त्यांनी अर्ज मंजूर करावा, अशी विनंती केलेली आहे.

०३. वादींनी सदरच्या अर्जाला निशाणी क्र. २३ द्वारे म्हणणे दाखल करुन विरोध केलेला आहे. त्यांच्यानुसार, सदर प्रतिवादींनी

न्यायालयाने वारंवार पुरेशा संधी दिलेल्या होत्या; परंतु त्यांनी वाजवी कारण नसताना वेळेत लेखी कैफियत सादर केलेली नाही, तर त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केलेले आहे त्यामुळे त्यांना स्वत:चा निष्काळजीपणाचा लाभ घेता येणार नाही. त्यांच्यानुसार, दरम्यानच्या कालावधीमध्ये त्यांच्याकडे दोन साक्षीदारांचे सर तपासणीचे प्रतिज्ञापत्रं दाखल केलेली आहेत आणि ते उलट तपासणीविना स्वीकारण्यात आलेली आहेत. तेव्हा प्रतिवादींचा सदरचा अर्ज मंजूर केला तर त्यांनी दाखल केलेला संपूर्ण पुरावा व्यर्थ आणि निष्फळ ठरणार आहे. शिवाय सदर प्रतिवादींनी विलंब स्पष्ट करणारा कोणताही विश्वासहर्य पुरावा दिलेला नाही. त्यामुळे त्यांचा बचाव स्वेच्छाधिकारातहत स्वीकारणे वाजवी होणार नाही. त्यामुळे त्यांचे अपरिमित आणि पैशाच्या स्वरुपात मोजता येणार नाही असे नुकसान होणार आहे. शिवाय सदर प्रतिवादीं प्रकरणाचा निर्णय प्रलंबित ठेवण्याच्या हेतुने आणि त्यांना त्रास व्हावा म्हणून विलंब करीत आहेत. तेव्हा त्यांचा सदरचा अर्ज नामंजूर करावा, अशी विनंती केलेली आहे.

०४. प्रतिवादींसाठी वकील श्री. पी. डी. क्षीरसागर यांना ऐकले तर वादींसाठी वकील श्री. डी. एस. उंदरे यांना ऐकले.

०५. अभिलेखाचे अवलोकन केले असता हे स्पष्ट होते की, सदर प्रतिवादींच्याविरुद्ध दिनांक ०८/११/२०२४ रोजीच्या निशाणी क्र. १ खालील आदेशानुसार दावा विना लेखी कैफियत चालविण्याचा आदेश पारीत झालेला आहे. त्यानंतर वादीतर्फे साक्षीदार क्र. १ व २ यांची पुराव्याची प्रतिज्ञापत्रे अभिलेखावर

आलेली आहेत, जी सदर प्रतिवादींच्याविरुद्ध विना उलट तपासणी स्वीकारण्यात आलेली आहेत आणि त्यानंतर सदरचा अर्ज हा दिनांक २८/०४/२०२६ रोजी आलेला आहे. सदरच्या अर्जामध्ये विलंब स्पष्ट करण्यासाठी घेतलेल्या बचावाचे अवलोकन केले असता प्रतिवादींनुसार, त्यांना आवश्यक ती माहिती आणि कागदपत्रे उपलब्ध झालेली नव्हती; परंतु या संदर्भाने लेखी कैफियतचे अवलोकन केले असता त्यासोबत कोणतीही अशी कागदपत्रे दाखल केलेली नाहीत ज्या अभावी सदर प्रतिवादींना लेखी कैफियत सादर करता येवू शकली नव्हती. त्यामुळे सदर विलंबाचे कारण हे संदिग्ध स्वरुपाचे आहे. शिवाय प्रतिवादींची वये लक्षात घेतली असता ती काही वयोवृद्धत्वाची आहेत असे म्हणता येणार नाही. तेव्हा श्री. उंदरे यांनी निवेदन केल्यानुसार, प्रतिवादींचा विलंब सुस्पष्ट करण्यासाठीचा बचाव हा स्वीकाहर्य नाही; परंतु ही कायद्याची स्थिती आहे की, कोणत्याही प्रकरणाचा निर्णय हा अंतीमरित्या आणि गुणवत्तेवर व्हावयास हवा आणि तो प्रतिवादींच्या बचावाशिवाय सादर होणे संभव नाही. त्यामुळे केवळ विलंब केलेला आहे या कारणावरुन सदर प्रतिवादीं जेव्हा लेखी कैफियतीसह आलेले आहेत तेव्हा ती अभिलेखावर घेण्याचे नाकारणे उचित होणार नाही, कारण त्यामुळे प्रकरणाचे अनेकीकरण होण्याची भीती आहे किंवा ते टाळण्यासाठी सदर प्रतिवादींना लेखी कैफियत सादर करण्यासाठी संधी देणे आवश्यक आहे.

०६. उपरोक्त काहीही असले तरी सदर प्रतिवादींनी

केलेल्या विलंबाला देखील नजरेआड करता येणार नाही. पक्षकारांनी हे लक्षात ठेवणे आवश्यक आहे की, त्यांच्या विलंबाच्या कृतीमुळे ना केवळ सार्वजनिक वेळ आणि श्रम वाया जातात, तर विरुद्ध पक्षाचा खर्च वाढतो तसाच तो शासनाचा देखील खर्च वाढविण्यास कारणीबुत ठरतो, कारण शासन हे कल्याणकारी शासन म्हणून अशा कार्यवाहीवर स्वस्त न्याय्य देण्याच्या हेतुने मोठा खर्च करीत असते. तेव्हा पक्षकारांनी प्रत्येक कृती ही योग्य वेळी आणि तत्परतेने करणे आवश्यक आणि वाजवी असते अन्यथा अशी दिरंगाई करणारे पक्षकार ना केवळ विरुद्ध पक्षाला भरपाई देण्यासाठी जबाबदार ठरतात, तर शासनाचा अधिकच्या खर्चाची भरपाई करण्यासाठी देखील जबाबदार ठरतात. हातातील प्रकरणामध्ये तर श्री. क्षीरसागर यांनी जरी प्रतिवादींचे वय, आजार आणि महत्त्वाची कागदपत्रे उपलब्ध नसल्याच्या बाबींकडे लक्ष वेधले असले तरी उपरोक्त कारणमिमांसेतहत हा युक्तीवाद काही मनाला पटण्यायोग्य नाही. तेव्हा सदर प्रतिवादींवर परीव्यय लादणे आवश्यक आहे, जेणेकरुन ना केवळ वादींना भरपाई मिळेल, शासनाचा अधिकचा खर्च भरुन निघेल तर सदर प्रतिवादींना धडा मिळेल की, त्यांच्या दिरंगाईच्या कृतीमुळे त्यांना आर्थिक भुरदंड होवू शकतो. तेव्हा अर्ज मंजूर करताना खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे:

## <u>आदेश</u>

१. अर्ज रक्कम रुपये २,०००/— परीव्यय लादून मंजूर करण्यात येत आहे;

२. सदर प्रतिवादींनी परीव्यय रकमेपैकी रुपये १,२००/— वादींना भरपाई म्हणून पुढील तारखेपर्यंत हस्ते दिल्यावरून, किंवा देण्यासाठी न्यायालयात जमा केल्यावरून आणि उर्वरीत शासनजमा केल्यावरून त्यांच्याविरुद्ध दावा लेखी कैफियतविना चालविण्याचा केलेला आदेश रद्‌दबातल ठरविण्यात येईल आणि अर्जासोबतची त्यांची लेखी कैफियत अभिलेखावर घेण्यात येईल;

३. परीव्यय हा अर्जदार/सदर प्रतिवादींवर राहील.

Digitally signed by BHAGWAN DHONDIRAM PANDIT
Date: 2026.06.09 18:02:17 +0530

दिनांक: ०९.०६.२०२६

**(भगवान धों. पंडित)**
दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर,
भूम, जि. उस्मानाबाद.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P D F file order/ judgment are same word to word as per the original order/judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | N. V. Koli<br>Stenographer Grade-II |
| Name of Court | : | Civil Judge Senior Division<br>Bhoom, Tq. Bhoom<br>Dist. Osmanabad. |
| Order/ Judgment date | : | 09.06.2026 |
| Order/ Judgment signed by the Presiding Officer on | : | 09.06.2026 |
| Order/ Judgment uploaded on | : | 09.06.2026 |